# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 04/01/2023 (बुधवार) सकाळ

---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूध गुन्हा नोंद

**पो.स्टे. खापा** :– अंतर्गत ०७ कि.मी. अंतरावरील मौजा रामडोंगरी शिवार येथे दिनांक ०३/०१/२०२३ चे ०१.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– कल्लु हसन कनोजे, वय ५६ वर्ष मंडळ अधिकारी खापा रा. प्लाट नं २० इंद्रायणी नगर गोरेवाडा नागपुर हे अवैद्य उत्खनना बाबत पेट्रोलींग करीत असतांना यातील आरोपी नामे– १) टॅक्टर क्र. एम.एच –४० एल–९९५५ चा चालक मालक २) अजय मधु हिंगे याची जेसीपी चे चालक मालक ३) मृणाल हरडे सर्व रा. खापा यांनी आपल्या ताब्यातील ट्रॅक्टरचे ट्रॉलीमध्ये एक ब्रास रेतीची चोरटी अवैद्य वाहतुक करीत असतांना घटनास्थळावर मुद्देमाल व ट्रॅक्टर सोडुन पळुन गेले. घटनास्थळावर एक ब्रास रेती किंमती अंदाजे २६०० रू. चा मुद्देमाल व ट्रॅक्टर ट्रॉली किंमती अंदाजे ३,००००००/– रू असा एकुण ३,०२६००/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला तसेच आरोपी अभय हिंगे याने उत्खननात वापरात आणलेली जेसीपी मशिन घटनास्थळावरून पळुन नेले तसेच आरोपी जेसीपी चालक मृणाल हरडे याने पळुन जाण्यास मदत केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. खापा येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, १०९, ३४ भांदवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक मानकर मो. नं ९४२२९४२७६४ हे करीत आहे.

## दुखापत

**पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०५ किमी अंतरावर खदान नं. ०३ टी पॉइंट कन्हान येथे दिनांक ०३/०१/२०२३ चे १६.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुरेन्द्र महादेव करपे, वय ४८ वर्ष, रा. खदान नं ०३ मडीबाबा कन्हान ता. पारशिवनी हा खदान नं ०३ च्या टी पॉइंट वर टायर च्या दुकानात बसुन मोबाईल पाहत बसला असता तिथे आरोपी नामे–शुभम नेमचंद राउत हा आला आणि फिर्यादीला दारु मागु लागला फिर्यादी ने आरोपीला म्हटले की ''मैने दारु बेचने का काम बंद किया है मेरे पास दारु नही है'' फिर्यादी चे बोलणे ऐकुन आरोपी शुभम राउत हा फिर्यादीशी शिवीगाळ करुन झगडा भांडण करु लागला आणि त्याचा जवळ असलेल्या एका लोंखडी चाकु ने फिर्यादीच्या उजव्या हाथाच्या बोटाला मारुन जखमी करुन तिथुन पळुन गेला आणि फिर्यादीला पाहुन घेण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०६ भादंवी कलम ४, २५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध सुरू असुन असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक फुलझेले मो.नं ९४०४१२३९५० हे करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर